# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** जागनाथ बुधवारी, टिबी दवाखाना जवळ प्रस्तावित मल्टीलेव्हल पार्कींग प्रकल्पास्तव आवश्यक जागेकरिता नागपूर महानगरपालिका, नागपूर च्या मालकीची मौजा नागपूर न.भू.क्र. ५३५, शिट क्र. १३२ येथील सुमारे ३० ते ३५ वर्ष जुनी व शिकस्त बंद शाळेच्या इमारतीचे बांधकाम क्षेत्र २२७.५ चौ.मी. तसेच सुमारे ३५ ते ४० वर्ष मातीचे व टिनाचे छत असलेले जुने शिकस्त बांधकाम क्षेत्र २०४.४ चौ.मी. इमारतीचे बांधकाम पाडण्याचा प्रस्ताव विचारात घेणे.

**{सा.बां.वि. झोन क्र. ०७}**

टिप :-

१. नगर रचना विभागाचे अभिप्राया नुसार सदर्हु ठिकाणी मल्टीलेव्हल पार्कींगचे प्रस्तावित बांधकाम अनुज्ञेय आहे.
२. शिक्षण विभागाचे अभिप्राया नुसार बंद शाळेचे जागेवर कोणताही उपक्रम नसल्याबाबतचा अभिप्राय प्राप्त आहे.
३. आरोग्य विभागाचे अभिप्राया नुसार सध्या सुरु असलेल्या दवाखान्याची जागा सोडून मल्टीलेव्हल पार्कींग प्रस्तावित करण्यास आरोग्य विभागाची नाहरकत आहे.
४. सविस्तर तपशील नस्तीमध्ये टाचण आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 50/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 26/02/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सतरंजीपुरा झोन क्र. ०७ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार जागनाथ बुधवारी, टिबी दवाखाना जवळ प्रस्तावित मल्टीलेव्हल पार्कींग प्रकल्पास्तव आवश्यक जागेकरिता नागपूर महानगरपालिका, नागपूर च्या मालकीची मौजा नागपूर न.भू.क्र. ५३५, शिट क्र. १३२ येथील सुमारे ३० ते ३५ वर्ष जुनी व शिकस्त बंद शाळेच्या इमारतीचे बांधकाम क्षेत्र २२७.५ चौ.मी. तसेच सुमारे ३५ ते ४० वर्ष मातीचे व टिनाचे छत असलेले जुने शिकस्त बांधकाम क्षेत्र २०४.४ चौ.मी. इमारतीचे बांधकाम पाडण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.